# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

<u>अत्यंत तातडीचे</u>

क्रमांक : १८२१८ / ग-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : 16 DEC 2021 डिसेंबर, २०२१

## :: परिपत्रक ::

महाराष्ट्र विधानमंडळाचे **सन २०२१ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी** पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होत आहे. **<u>त्याअनुषंगाने आगामी अधिवेशनात सुरक्षा व्यवस्थाविषयक त्याचप्रमाणे, कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.</u>**

(१) **<u>विधान भवन, मुंबई येथील मुख्य प्रवेशद्वाराजवळ दिनांक २० व २१ डिसेंबर, २०२१ रोजी तसेच, पुढील आठवडयासाठी दिनांक २५ व २६ डिसेंबर, २०२१ रोजी सकाळी ८.०० वा. ते सायंकाळी ६.०० वा. या वेळेत ज्यांचे कोविड-१९ प्रतिबंधात्मक लसीकरणाचे दोन डोस घेऊन १४ दिवस पूर्ण झाले आहे त्यांच्यासाठी RT-PCR चाचणी करुन घेण्यासंदर्भातील सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. दिनांक २० डिसेंबर, २०२१ व पूढील आठवडयासाठी दिनांक २५ डिसेंबर, २०२१ रोजी सकाळी ८.०० ते ११.०० या वेळेत सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक यांची RT-PCR चाचणी करण्यात येईल व तद्नंतर इतर अधिकारी/कर्मचारी यांची RT-PCR चाचणी करण्यात येईल. अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करणाऱ्या प्रत्येक मान्यवर व्यक्ती तसेच अधिकारी/ कर्मचारी यांनी ही चाचणी करुन घेणे आवश्यक आहे. अधिवेशनाकरीता उपस्थित राहणारे मान्यवर सर्व सन्माननीय सदस्य, विधानमंडळ अधिकारी / कर्मचारी, सदस्यांचे स्वीय सहाय्यक, सुरक्षा अधिकारी / कर्मचारी, वृत्त वाहिन्यांचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी / कर्मचारी आणि इतर इत्यादीनी कोरोना चाचणी करिता</u>** www.mls.org.in/covid-report/rtpcr.html **<u>या लिंक वर जाऊन तेथे देण्यात आलेल्या वर्गवारीनुसार नोंदणी करुन टोकन क्रमांक प्राप्त करुन घ्यावा व त्यानंतर विधानभवन, मुंबई येथील मुख्य प्रवेशद्वारासमोर उभारण्यात आलेल्या कोरोना चाचणी केंद्र येथे जाऊन संबंधितांना टोकन नंबर सांगून व स्वत:चे ओळखपत्र दाखवून कोरोना चाचणी करुन घ्यावी. त्यानंतर विधानभवन, मुंबई येथील मुख्य प्रवेशद्वार येथे करण्यात आलेल्या व्यवस्थेच्या ठिकाणी संबंधितांना त्यांचे कोरोना चाचणीचे अहवाल उपलब्ध करुन देण्यात येतील. ज्यांचे चाचणी अहवाल नकारात्मक ( Negative) असतील अश्या व्यक्तींनाच विधान भवन येथे प्रवेश देण्यात येईल. विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सामाजिक अंतर राखणे सोईचे व्हावे यासाठी सर्व मान्यवर व्यक्ती तसेच, अधिकारी/कर्मचारी यांनी नियोजित वेळेपूर्वी उपस्थित राहणे आवश्यक राहील.</u>**

.. २/-

(२) **विधान भवनाचे आवारात कोणत्याही मान्यवरांना/अभ्यांगतांना शासकीय वा अशासकीय वाहनाने प्रवेश करता येणार नाही.**

(३) **विधान भवनाच्या गेट क्रमांक-१ जवळील मोकळया जागेत नेमून दिलेल्या ठिकाणावरच सर्व वाहने थांबविण्यात येतील व तेथून मान्यवरांना विधान भवन परिसरात व विधान भवनाच्या मुख्य पोर्चमध्ये चालत प्रवेश करावा लागेल.**

विधान भवन परिसरात सर्व मान्यवरांच्या वाहनांची मुख्य प्रवेशद्वाराजवळील मोकळ्या प्रांगणात पार्किंगची व्यवस्था (वाहनतळ व्यवस्था) खालीलप्रमाणे केलेली आहे.

पी-१ : **मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**
- **मा.उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा, मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.**

पी-२ : **मा.मंत्री, मा.राज्यमंत्री, मा.मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव, मा.पीठासीन अधिकाऱ्यांचे सचिव,**
- **मंत्रालयीन प्रधान सचिव व सचिव तसेच, विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी.**

पी-३ : **मुख्य सुरक्षा अधिकारी, वरिष्ठ पोलीस अधिकारी, वृत्तपत्र व दूरचित्रवाहिन्यांचे प्रतिनिधी.**

पी-४ : **महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे सर्व सदस्य (युनियन बँकेसमोरील मोकळी जागा).**

(४) विधान भवनात प्रवेश करताना गेट क्रमांक-१ मधून प्रवेश करण्याची व गेट क्रमांक-२ मधून बाहेर जाण्याची व्यवस्था केली आहे. त्याठिकाणी वाहन बोलविण्याची व्यवस्था (Car Calling System) करण्यात आली आहे.

(५) **मा.सदस्यांनी त्यांना 'विधानमंडळ सदस्य' म्हणून दिलेला बॅज सहजरित्या दिसेल अशा ठिकाणी लावावा.**

(६) अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व संबंधितांनी ओळखपत्र/प्रवेशपास दर्शनी भागावर दिसेल अशाप्रकारे लावणे आवश्यक आहे.

(७) विधान भवन मुख्य प्रवेशद्वार (गेट क्रमांक-१) च्या उजव्या बाजूस तसेच, मागील प्रवेशद्वारावर वैयक्तिक सुरक्षा तपासणीसाठी एक्स-रे बॅगेज तपासणी यंत्रणा स्थापित करण्यात आली आहे. अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना कोविड विषयक पडताळणी व सुरक्षा तपासणी पूर्ण झाल्यानंतर विधानभवन इमारतीत प्रवेश देण्यात येईल.

(८) मा.मुख्यमंत्री/मा.उपमुख्यमंत्री/मा.मंत्री/मा.राज्यमंत्री/मा.विधानमंडळ सदस्य तसेच, विभागाचे प्रधान सचिव, सचिव व वार्ताहर यांच्या वाहनासाठी प्रवेशपत्रिका 'ग-१' कक्षाकडून घेऊन त्या वाहनावर स्पष्ट दिसतील अशा लावण्यात याव्यात. सदर प्रवेशपत्रिका असलेल्या वाहनांनाच सुरक्षा विभागाने तपासणी केल्यानंतर विधान भवनासमोरील मोकळ्या परिसरात प्रवेश दिला जाईल.

.. ३/-

(९) विधान भवनाच्या मुख्य प्रवेशद्वारातून फक्त खालील व्यक्तींना प्रवेश देण्यात येईल.

(i) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा.

(ii) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

(iii) मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.

(iv) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद.

(v) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा.

(vi) दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेते,

(vii) राज्य मंत्रीमंडळातील मा.मंत्री/राज्यमंत्री.

(vii) दोन्ही सभागृहांचे सर्व सन्माननीय सदस्य.

(ix) दैनिक वृत्तपत्रांचे व दूरचित्रवाहिन्यांचे संपादक व प्रतिनिधी. (निश्चित केलेल्या संख्येमध्ये)

(x) विधानमंडळाचे प्रधान सचिव व इतर अधिकारी/कर्मचारी.

(xi) मा.पीठासीन अधिकाऱ्यांचे सचिव, मा.उप पीठासीन अधिकारी/दोन्ही सभागृहांचे मा.विरोधी पक्षनेते यांचे खाजगी सचिव, विशेष कार्य अधिकारी, जनसंपर्क अधिकारी व विधानमंडळाचे कर्मचारी

(xii) मा.मंत्री/राज्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव किंवा एक विशेष कार्य अधिकारी किंवा स्वीय सहायक व दोन शिपाई.

(xiii) मा.मुख्य सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, मंत्रालयीन विभागाचे प्रधान सचिव, सचिव, सह सचिव, उप सचिव व संबंधित विभागाचे विभाग प्रमुख व संचालक पदाच्या दर्जाचे वरिष्ठ अधिकारी.

(xiv) मा.पोलिस महासंचालक, मा.पोलिस आयुक्त, मुंबई व वरिष्ठ पोलिस अधिकारी

(१०) विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना स्वत:चे ओळखपत्र तसेच विधानमंडळ सचिवालयाने दिलेल्या अधिकृत प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र असल्यानंतरच विधान भवनात प्रवेश मिळेल. तसेच, प्रवेशपत्रिका घेवून विधानभवन इमारतीत अथवा परिसरात संबंधित प्रवेशपत्रिका धारकाने काही अनूचित प्रकार केल्यास अशा व्यक्तीचा प्रवेश पास जमा करुन त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

.. ४/-

(११) विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करण्यासाठी अभ्यांगतांना ६ ते १२ महिन्यांसाठीचे प्रवेशपास वितरीत करण्यात आले आहेत. सदरचे प्रवेशपास अधिवेशन कालावधीकरीता सुरक्षेच्या कारणास्तव स्थगित करण्यात आले आहेत.

(१२) मा.मंत्री महोदयांचे खाजगी सचिव किंवा १ स्वीय सहायक तसेच मा.मुख्य प्रतोद / प्रतोद यांचा १ स्वीय सहायक यांना विधानमंडळाच्या अधिकृत प्रवेशपत्रिकेवर प्रवेश मिळेल.

(१३) **मा.मंत्री महोदयांच्या/मा.सदस्यांच्या स्वीय सहायकांना, अंगरक्षकांना तसेच, वाहनचालकांना विधान भवनात प्रवेश करता येणार नाही. त्यांच्यासाठी युनियन बँकेसमोरील मोकळ्या जागेत उभारण्यात आलेल्या मंडपामध्ये व्यवस्था करण्यात आलेली आहे.**

(१४) अधिवेशन कालावधीत मा.मंत्री महोदयांना भेटण्यासाठी येणाऱ्या **शिष्टमंडळाना कोणत्याही परिस्थितीत विधानभवनामध्ये प्रवेश देण्यात येणार नाही.** अति आवश्यक शिष्टमंडळाच्या प्रतिनिधींची विधान भवनाच्या बाहेरील परिसरात युनियन बँकेसमोरील मोकळ्या जागेत मंडपामध्ये व्यवस्था केलेली आहे. मा.मंत्री महोदयांना त्याठिकाणी शिष्टमंडळाला भेटता येईल.

(१५) **अधिवेशन कालावधीत मा.मंत्री महोदयांनी कोणत्याही प्रकारच्या शिष्टमंडळांना भेटीसाठी विधान भवनातील त्यांच्या दालनात न बोलविता मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयात भेट घ्यावी.**

(१६) **अधिवेशन कालावधीत मा.मंत्रीमहोदयांनी विभागीय अधिकाऱ्यांना माहिती अवगत करून घेण्यासाठी (ब्रिफिंगसाठी) विधान भवनातील त्यांच्या दालनात न बोलविता मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयात बोलवावे.**

(१७) **वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना त्यांच्या वृत्तसंस्थेने दिलेले ओळखपत्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने दिलेले अधिस्वीकृतीधारक ओळखपत्र (Press Accreditation Card) तसेच, या सचिवालयाने दिलेल्या प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र व कोविड-१९ प्रतिबंधात्मक लसीकरणचे दोन डोस घेतलेल्यांना RT-PCR चाचणीचा अहवाल नकारात्मक ( Negative) असल्यानंतर विधान भवनात प्रवेश मिळेल.**

**(१८) खाजगी दूरचित्रवाहिन्यांच्या प्रतिनिधींना त्यांच्या दूरचित्रवाहिन्यांनी दिलेले ओळखपत्र तसेच, या सचिवालयाने दिलेल्या प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र व कोविड-१९ प्रतिबंधात्मक लसीकरणचे दोन डोस घेतलेल्यांना RT-PCR कोरोना चाचणीचा अहवाल नकारात्मक ( Negative) असल्यानंतर विधान भवनात प्रवेश मिळेल.**

**(१९) दिनांक १५ डिसेंबर, २०२१ रोजी मंत्रालय-विधीमंडळ वार्ताहर संघ तसेच, टिव्ही जर्नलिस्ट असोसिएशन, संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचनालय, मंत्रालय, मुंबई व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने अधिवेशन कालावधीत मराठी दूरचित्रवाहीन्यांच्या प्रतिनिधींना विधान भवन, मुंबई येथे प्रवेश देताना याप्रमाणे प्रवेश देण्यात येईल.**

**(२०) खाजगी दूरचित्रवाहिन्यांच्या प्रतिनिधींची विधान भवन परिसरात नेमून दिलेल्या ठिकाणी व्यवस्था करण्यात आली असून त्यांनी त्या जागेवरूनच चित्रीकरण करावे.**

**(२१) मोबाईल फोन, कॅमेरा किंवा इतर साधनांनी विधान भवन इमारत व विधान भवन परिसरात चित्रीकरण करु नये.**

**(२२) कोणत्याही प्रकारची प्रवेश पत्रिका घेवून विधान भवन आवारात प्रवेश केलेल्या व्यक्तीने काही गैरवर्तन केल्यास अशा व्यक्तीस विधानभवनाबाहेर काढण्यात येईल.**

(२३) अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा. मुंबई दूरदर्शन ओ.बी.व्हॅन, शासकीय रूग्णवाहिका, महानगरपालिकेचे स्वच्छता वाहन, शासकीय मुद्रणालयाचे लेखन व मुद्रण साहित्य घेऊन येणारी वाहने, उपाहारगृहासाठी लागणारे साहित्य, खाद्यपदार्थ, दूध, गॅस, सिलेंडर इ. घेऊन येणारी वाहने या सर्व वाहनांना विधानमंडळाने दिलेल्या अधिकृत प्रवेशपत्रिकेची तपासणी सुरक्षा विभागाने केल्यानंतर (स्टेट बँकेसमोरील) वाल्मिकी गेटमधून प्रवेश देण्यात येईल.

.. ६/-

(२४) विधान भवन इमारतीमध्ये प्रवेश करतेवेळी सुरक्षा विभागाकडून केली जाणारी सुरक्षा तपासणी ही आपल्या सर्वांच्या सुरक्षिततेसाठी असल्याने यासंदर्भात सर्व संबंधितांनी कृपया सहकार्य करावे.

(२५) विधानमंडळामध्ये प्रवेश करताना कोविड-१९ संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व सूचना तसेच, सर्व उपाययोजनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

वरील सुरक्षाविषयक सूचनांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे निदेशानुसार कळविण्यात येत आहे.

**( अनिल महाजन )**
सह सचिव (समिती) तथा
विशेष कार्य अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

(१) दोन्ही सभागृहांचे सर्व सन्माननीय सदस्य.

(२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

(३) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.

(४) मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.

(५) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/विशेष कार्य अधिकारी.

(६) मा.विरोधी पक्षनेता महाराष्ट्र विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव.

(७) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव.

(८) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव.

(९) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

(१०) मंत्रालयातील विभागांचे सर्व अति.मुख्य सचिव, प्रधान सचिव/सचिव.

(११) मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(१२) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

(१३) मा.पोलीस आयुक्त, मुंबई.

(१४) मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघ, मंत्रालय, मुंबई

(१५) महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व अधिकारी व कक्ष.

(१६) महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व पक्ष कार्यालये, विधान भवन, मुंबई.

(१७) टि.व्ही.जर्नलिस्ट असोसिएशन, डी-बॅरेक, डी कामा, इनासमेन्ट, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.